दै. [illegible] (1)

# आचारसंहितेची अंमलबजावणी मंदगतीने

## ▪ शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या स्वतंत्र तक्रारी ▪

नांदेड, दि. ७ : मनपा निवडणुकीचा बुधवारी बिगूल वाजल्यानंतर निवडणूक आचारसंहिता तात्काळ सुरू झाली असली तरी मनपा प्रशासनाकडून त्याची अंमलबजावणी मंदगतीने सुरू असून रस्त्या-रस्त्यावर लावलेले बॅनर, पोस्टर गुरूवारी तसेच दिसून आले. या विरोधात शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने बॅनर लावणाऱ्यांविरोधात कारवाई करण्याची मागणी केली आहे. शिवसेनेने वजिराबाद पोलिस ठाण्यात याबाबत रितसर तक्रार दाखल केली आहे. तर राष्ट्रवादी कॉंग्रेसने आपली तक्रार मनपाच्या सहाय्यक आयुक्तांकडे केली आहे.

शिवसेनेचे सहसंपर्क प्रमुख डॉ. मनोजराज भंडारी, माजी जिल्हाप्रमुख प्रकाश मारावार, बळी रोत्रे, भाया शर्मा यांनी गुरूवारी वजिराबाद पोलिस ठाण्यात आचारसंहिता भंगची तक्रार दाखल केली असून वजिराबाद पोलिस ठाण्याच्या हद्दीत चिखलवाडी कॉर्नर, कलामंदिर परिसर, जुनामोंढा, हिंगोली गेट रस्ता व इतर ठिकाणी पक्षीय चिन्हाचे मोठ-मोठे बॅनर लावून निवडणूक आचारसंहितेचा भंग करणाऱ्या पक्षावर व बॅनर लावणाऱ्यांविरूध्द कारवाईची मागणी केली आहे. गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्याचा शिवसेनेचा हा रोख भाजपावर असला तरी त्यांनी आपल्या तक्रारीत भाजपाच्या नावाचा कुठेही उल्लेख केलेला नाही.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे शहर जिल्हा सचिव मोहम्मद इम्रानअली उर्फ बशर मोहम्मद बशीर अली यांनी मनपाच्या सहाय्यक आयुक्तांकडे केलेल्या तक्रारीत मात्र एमआयएम या पक्षाने आचारसंहिता भंग केल्याचा आरोप केला आहे. प्रभाग क्र. ५ मध्ये एम.आय.एम.च्या कार्यकर्त्यांनी पतंग चिन्ह लावून आचारसंहितेचा भंग केला असल्याचे या तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

दै. लोकमत (2)

# आचारसंहिता अंमलबजावणीसाठी विशेष पथक

लोकमत न्यूज नेटवर्क

नांदेड : महापालिकेच्या निवडणुकीची घोषणा राज्य निवडणूक आयोगाने बुधवारी सायंकाळी केली. त्या क्षणापासूनच आचारसंहितेचा अंमल सुरु झाला असून महापालिकेने आचारसंहितेच्या अनुषंगाने कारवाईला प्रारंभ करताना शहरातील बॅनर हटविण्याचे काम हाती घेतले. बुधवारी रात्रीच प्रमुख चौकातील बॅनर हटविण्यात आले होते.

महापालिकेच्या २० प्रभागातील ८१ वार्डांसाठी ११ ऑक्टोबर रोजी मतदान होणार आहे निवडणूक कालावधीत आचारसंहितेचा भंग होणार नाही यासाठी महापालिका निवडणूक विभाग सज्ज झाला आहे. गुरुवारी आयुक्त गणेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील पोलिस अधिकारी, महापालिका अधिकारी तसेच मुद्रणालयाचे प्रतिनिधीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत आचारसंहितेसंदर्भात माहिती देवून आदर्श आचारसंहितेचा कुठेही भंग होणार नाही, याची खबरदारी घेण्याचे आवाहन आयुक्त देशमुख यांनी केले.

आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी २८ सप्टेंबर ते १० ऑक्टोबर या कालावधीत भरारी पथक नेमण्यात येणार आहे. निवडणुकीमध्ये लाऊडस्पीकर, सभेच्या जागा इत्यादी विषयी नाहरकत प्रमाणपत्र देण्याबाबत आणि परवानाधारक मुद्रणालयाकडून छापील साहित्यावर मनपाकडून देण्यात आलेल्या परवाना क्रमांक ठळक अक्षरात उल्लेख करणे आवश्यक आहे.